प्रसिध्दी पत्रक

श्री. धना पांडुरंग गोंडे, वय ४५ वर्षे, पोहेकॉ/१०८३, पोलीस स्टेशन गंगापुर, औरंगाबाद (ग्रामीण) रा. शिक्षक कॉलनी, लासुर स्टेशन, औरंगाबाद हे ८,०००/- रुपयाची लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. धना पांडुरंग गोंडे, वय ४५ वर्षे, पोहेकॉ/१०८३, पोलीस स्टेशन गंगापुर, औरंगाबाद (ग्रामीण) रा. शिक्षक कॉलनी, लासुर स्टेशन, औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक २८/०६/२०१८ रोजी पोलीस स्टेशन गंगापुर, औरंगाबाद ग्रामीण |
| लाचेची रक्कम | :- | ८,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचेवर चोरुन गुटखा विक्री केल्याबाबत गुन्हा दाखल न करण्यासाठी |

यातील तक्रारदार हे गंगापुर येथे किराणा मालाचे दुकान असुन तो दुकानात गुटखा विक्रीचा व्यवसाय करीत होते. तक्रारदारवर चोरुन गुटखा विक्री केल्याबाबत गुन्हा दाखल न करण्यासाठी पोलीस हवालदार श्री. धना पांडुरंग गोंडे यांनी तक्रारदार यांच्याकडे १५,०००/- रु मागणी केली, त्यावेळी तक्रारदार यांची श्री. धना पांडुरंग गोंडे, व्यवसाय नौकरी- पोलीस हवालदार, बक्कल नंबर १०८३, पोलीस ठाणे गंगापुर, औरंगाबाद ग्रामीण यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक २८/०६/२०१८ रोजी श्री. धना पांडुरंग गोंडे, वय ४५ वर्षे, पोहेकॉ/१०८३, पोलीस स्टेशन गंगापुर, औरंगाबाद ग्रामीण, रा.शिक्षक कॉलनी, लासुर स्टेशन औरंगाबाद यांच्याकडे पंच साक्षीदारासमक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, श्री. धना गोंडे यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रु लाचेची मागणी करून, तडजोडी अंती ८,०००/- रु लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.२८/०६/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, श्री. धना पांडुरंग गोंडे, वय ४५ वर्षे, पोहेकॉ/१०८३, पोलीस स्टेशन गंगापुर, औरंगाबाद ग्रामीण, रा.शिक्षक कॉलनी, लासुर स्टेशन औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष ८,०००/- रुपये लाचेची रक्कम पोलीस स्टेशन गंगापुर औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४

Mail ID :- dyspacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद

(सचिन गवळी)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद